महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.२३/ १३९६१
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : २३/०६/२०२१

# परिपत्रक

**विषय :** प्रशासकीय परिपत्रक क्र. ५५३ दि. २४.०३.२०१७ अंतर्गत नियत कालावधीपूर्व सेवानिवृत्ती घेतलेल्या कर्मचाऱ्यांच्या अर्हतारहीत वारसांना आयटीआय इलेक्ट्रीशियन/वायरमन अर्हता प्राप्त करण्यास मुदतवाढ देण्याबाबत.

**संदर्भ :** पत्र क्र. मासंवि/रवका/न.क्र.९/२१६६६ दि. ०८.१२.२०२०.

प्रशासकीय परिपत्रक क्र. ५५३ दि.२४.०३.२०१७ अन्वये प्रसृत करण्यात आलेल्या मुदतपूर्व सेवानिवृत्ती योजने अंतर्गत नमुद अटी व शर्ती नुसार कंत्राटी पध्दतीवर नियुक्त केलेले जे विद्युत सहाय्यक, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील आय.टी.आय. (तारतंत्री/वीजतंत्री) / सी.ओ.ई. / दोन वर्षांची (विद्युत/तारतंत्री) पदविका ही अर्हता धारण करीत नाहीत अशा विद्युत सहाय्यकांनी प्रथम तीन वर्षाचा कंत्राटी कालावधी पुर्ण होण्यापुर्वी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील आय.टी.आय. (तारतंत्री/वीजतंत्री) हा अभ्यासक्रम पूर्ण करणे अनिवार्य आहे. तसेच सदर विद्युत सहाय्यक यांनी आय.टी.आय. ही शैक्षणिक अर्हता तीन वर्षाच्या कालावधीत प्राप्त न केलेस त्यांची कंत्राटी सेवा समाप्त करण्यात यावी असे नमूद केले आहे.

२. सद्यस्थितीत कोवीड - १९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे विविध अभ्यासक्रमांच्या अंतिम परीक्षा शासनाकडून आयोजीत करण्यात आलेल्या नाहीत. तसेच आय.टी.आय. (तारतंत्री/विजतंत्री) अभ्यासक्रमाची परिक्षासुध्दा लांबणीवर गेलेली आहे. त्यामुळे संबंधीत विद्युत सहाय्यकांना ३ वर्षाच्या कंत्राटी कालावधीमध्ये शैक्षणिक अर्हता प्राप्त करता आली नाही. सदरची बाब विचारात घेउन सांघिक कार्यालयाचे पत्र क्र. मासंवि/रवका/न.क्र.९/२१६६६ दि. ०८.१२.२०२० अन्वये संबंधित उमेदवारांना आय.टी.आय. (तारतंत्री/विजतंत्री) ही अर्हता प्राप्त करण्यास मुदतवाढ देण्यात आली असून, त्या अनुषंगाने खालील मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

अ) आय.टी.आय. अभ्यासक्रमाची परीक्षा लांबणीवर गेल्यामुळे जे 'विद्युत सहाय्यक' सदरची अर्हता प्राप्त करू शकलेले नाहीत अशा विद्युत सहाय्यकांना औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमार्फत आय.टी.आय. (तारतंत्री/विजतंत्री) या अभ्यासक्रमाची जी प्रथम परीक्षा आयोजीत करण्यात येईल त्याच्या निकालाच्या दिनांकापर्यंत सदरची शैक्षणिक अर्हता प्राप्त करण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे.

ब) तीन वर्षांचा कंत्राटी कालावधी पूर्ण झाल्यानंतर मुदतवाढ देण्यात आलेल्या कालावधीमध्ये संबंधित विद्युत सहाय्यक यांना कोणतेही मानधन अदा करण्यात येणार नाही. तथापि, आय.टी.आय. (तारतंत्री/विजतंत्री) या अभ्यासक्रमाची भविष्यात आयोजीत करण्यात येणारी प्रथम परीक्षा उत्तीर्ण झाल्यास संबंधित विद्युत सहाय्यकास वाढीव कालावधीचे मानधन अदा करण्यात यावे.

क) तीन वर्षांच्या कालावधीमध्ये आय.टी.आय. (तारतंत्री/विजतंत्री) ही परीक्षा उत्तीर्ण न झाल्याबद्दल ज्या विद्युत सहाय्यकांचा कंत्राटी कालावधी समाप्त करण्यात आलेला आहे, असे विद्युत सहाय्यक आय.टी.आय. (तारतंत्री/विजतंत्री) या अभ्यासक्रमाची भविष्यात आयोजीत करण्यात येणारी प्रथम परीक्षा उत्तीर्ण झाल्यास त्यांना विद्युत सहाय्यक पदावर पुन:श्च नियुक्ती देण्यात यावी.

३. उपरोक्त मार्गदर्शक सूचना केवळ सन २०१८-१९ मध्ये आय.टी.आय. अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या म्हणजेच ज्यांची सदर अभ्यासक्रमाची अंतिम तथा व्दितीय वर्षाची परीक्षा पुढे ढकलण्यात आलेली आहे अशा उमेदवारांना लागू होतात/ आहेत. तथापि काही उमेदवारांना सन २०१८-१९ या वर्षात आय.टी.आय. अभ्यासक्रमास प्रवेश घेता आला नव्हता, त्यामुळे सदर उमेवारांनी सन २०१९-२० अथवा २०२०-२१ या शैक्षणिक वर्षामध्ये आय.टी.आय. अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला आहे. अशा उमेदवारांना देखील आय.टी.आय. (तारतंत्री/विजतंत्री) अर्हता प्राप्त करण्यास मुदतवाढ देण्याची बाब व्यवस्थापनाच्या विचाराधीन होती.

४. सबब, सक्षम अधिकारी यांनी दिलेल्या मंजुरीनुसार, सन २०१९-२० आणि २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात आय.टी.आय. (तारतंत्री/विजतंत्री) अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या उमेदवारांना सदरची अर्हता प्राप्त करण्यास खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे. मुदतवाढ देत असतांना खालील सूचना तथा कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

अ) सन २०१९-२० आणि २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात आयटीआय प्रशिक्षणास प्रवेश घेतलेल्या उमेदवारांना (विद्युत सहाय्यक), कोवीड परिस्थितीनंतर आय.टी.आय. वर्ग सुरू झाल्याच्या दिनांकापासून सदरची अर्हता प्राप्त करण्यास दोन वर्षांची मुदत वाढवून देण्यात येत आहे, तथापि सदर मुदतीमध्ये त्यांना मानधन देण्यात येणार नाही.

ब) दोन वर्षांच्या वाढीव मुदतीमध्ये संबंधितांने आय.टी.आय. अर्हता धारण केल्यास त्याने अर्हता प्राप्त केल्याचे प्रमाणपत्र सादर केल्याच्या दिनांकापासून त्याचे ३ वर्षाचे प्रत्यक्ष कामावरील कंत्राट सुरू करण्यात येईल.

क) वाढीव मुदतीमध्ये आय.टी.आय. अर्हता प्राप्त न करणाऱ्या विद्युत सहाय्यकांचे कंत्राट कायमस्वरूपी समाप्त करून प्रशासकीय परिपत्रक क्र. ५५३ दि. २४.०३.२०१७ मधील तरतुदीनुसार सेवानिवृत्त कर्मचाऱ्यास एकरकमी भरपाई अदा करण्यात येईल तसेच विद्युत सहाय्यकास अदा केलेले मानधन सदर रकमेतून वसूल करण्यात येईल.

ड) सन २०१८ ते २०२० या कालावधीमध्ये आय.टी.आय. प्रशिक्षणास प्रवेश घेतला नाही अशा विद्युत सहाय्यकांचे कंत्राट कायमस्वरूपी समाप्त करण्यात यावे व प्रशासकीय परिपत्रक क्र. ५५३ दि. २४.०३.२०१७ मधील तरतुदींनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी..

५. सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**(कमांडर शिवाजी इंदलकर) (से.नि.)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर :**

१) संचालक (वित्त)/ (संचलन)/ (वाणिज्य)/ (प्रकल्प)/ (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.
३) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.
४) कार्यकारी संचालक (सुवअं)/ (वित्त)/ (देयके व महसूल) म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.

**प्रत सस्नेह सादर :**

१) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)
२) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/ मुख्य विधी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
३) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या., नाशिक.
४) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई-५१.

**प्रत रवाना :**

१) महाव्यवस्थापक (मासं)/ (मासंव्यप्र)/ (नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/ मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
३) मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.